RNI No. MAHBIL /2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २८(९)] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ७४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	**पृष्ठे** १-२

दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सुप्रिया धावरे,
प्रारूपकार-नि-सह सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २५९अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे) याच्या प्रकरण १३, मध्ये कलम २५९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल आणि ते, उक्त संहितेच्या प्रारंभापासून नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

अपिलाची सुनावणी करण्याचा अधिकार.

"**२५९अ.** या प्रकरणान्वये राज्य शासनासमोर दाखल केलेले अपील, पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन याची सुनावणी, महसूल विभागाच्या प्रभारी मंत्र्याकडून अथवा प्रभारी मंत्र्याने तसे यथोचितरीत्या प्राधिकृत केलेले असेल तर, महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याकडून किंवा, अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा, यथास्थिति, सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग, याच्याकडून करण्यात येईल व त्यावर निर्णय देण्यात येईल.".

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

३. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये किंवा त्यान्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये अथवा उक्त संहितेच्या तरतुदींन्वये कार्य करणाऱ्या किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, महसूल विभागाच्या प्रभारी मंत्र्याने किंवा प्रभारी राज्यमंत्र्याने, किंवा अपर मुख्य सचिवाने किंवा प्रधान सचिवाने किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग याने, महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५ (यात यापुढे या कलमामध्ये ज्याचा निर्देश, "सुधारणा व विधिग्राह्यीकरण अधिनियम" असा केला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी उक्त संहितेन्वये अपिलांमध्ये, पुनरीक्षणांमध्ये किंवा पुनर्विलोकनांमध्ये केलेली कोणतीही कारवाई किंवा केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश; आणि महसूल अधिकाऱ्यांनी किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने केलेली कोणतीही कारवाई, केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश हे, जणू काही उक्त संहितेच्या तरतुदी, सुधारणा व विधिग्राह्यीकरण अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे सर्व महत्त्वाच्या वेळी सतत अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार, यथोचितरीत्या व वैधरीत्या केलेली कारवाई, केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश असल्याचे मानण्यात येतील आणि नेहमीकरिता करण्यात आलेली कारवाई, करण्यात आलेली गोष्ट, घेण्यात आलेले निर्णय किंवा पारित करण्यात आलेले निर्णय असल्याचे मानण्यात येतील, आणि त्यानुसार, अशा प्रारंभाच्या पूर्वी उक्त संहितेच्या तरतुदी, महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याला किंवा अपर मुख्य सचिवाला किंवा प्रधान सचिवाला किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग यास, राज्य शासनासमोर दाखल केलेल्या अपिलांची, पुनरीक्षणाची किंवा पुनर्विलोकनाची सुनावणी घेण्याचा व त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता, या कारणावरून, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. १९६६ चा महा. ४१. २०२५ चा महा. ६०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.